३४४१४

वाचा :- १) संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र. ८, दि. ०२/०२/२०११.
२) शासन निर्णय वित्त विभाग क्र. स्थानिले १०१०/प्र.क्र.२६- ब/विमा प्रशा, दि. ३१/०३/२०११.
३) संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र. २२, दि. १९/०४/२०११.

---

स्था.१८/ब/वार्षिक लेखे /प्रमाणीकरण /वलेप अहवाल/

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,कोकणभवन, ६ वा माळा,
नवी मुंबई ४०० ६१४.**

**कार्यालयीन आदेश क्र.** ३६ **दिनांकः-** 17 DEC 2013

संचालनालयाकडून वाचा क्र. १ मधील आदेशान्वये ग्रामपंचायतीचे वार्षिक लेखे प्रमाणित करताना महाराष्ट्र ग्रामपंचायत (हिशेब तपासणी) नियम १९६१ मधील नियम १८ (ग) नुसार प्रमाणित करण्यात यावे, असे कळविण्यात आले आहे. तसेच मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा नियम १९३१ मधील नियम २७ (ग) व (ह) नुसार लेखापरीक्षकाने स्थानिक स्वराज्य संस्थांचे वार्षिक लेखे प्रमाणित करणे अनिवार्य आहे.

तसेच दिनांक ०१/०४/२०११ पासून हाती घेतलेल्या ग्रामपंचायतींच्या वार्षिक लेख्यांची तपासणी करुन पथकप्रमुखांनी ग्रामपंचायत लेखे प्रमाणित करण्याचे आदेश संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र. २२, दि. १९/०४/२०११ मधील मुद्दा क्र. १ मध्ये देण्यात आलेले आहेत.

उपरोक्त वाचा क्र.२ मधील शासन निर्णयान्वये १३ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार परि. क्र. ४ मधील (म) नुसार राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेख्यांचे प्रमाणीकरण संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांनी करावयाचे असून योग्य प्रमाणीकरणाबाबत नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी पर्यवेक्षण करावयाचे आहे, असे आदेशित केले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांचे वार्षिक लेखे तपासणे/प्रमाणित करण्याची जबाबदारी स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागावर सोपविली आहे. तथापि प्रादेशिक विभागांतर्गत लेखापरीक्षकांकडून ग्रामपंचायतीचे वार्षिक लेखे प्रमाणित करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

..२..

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ८ व कलम ६२ (४) नुसार वार्षिक विवरणपत्र तयार करुन ते ग्रामसभेपुढे पहिल्या बैठकीत ठेवण्याची तरतूद आहे.

त्यानुसार उपरोक्तप्रमाणे कार्यवाही झालेले ग्रामपंचायत लेखे महाराष्ट्र ग्रामपंचायत (हिशेब तपासणी) नियम १९६१ चा नियम १८ (ग) नुसार प्रमाणित करुन प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. याबाबत कुचराई / निष्क्ाळजीपणा करण्याऱ्यांविरुध्द कारवाईचे प्रस्ताव सहाय्यक संचालकांनी संबंधित विभागीय सह संचालक यांना सादर करण्याच्या सूचना संदर्भ क्र. ३ अन्वये यापूर्वी निर्गमित केलेल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही होत असल्याबाबत सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा (विभागीय कार्यालये ) यांनी संनियंत्रण ठेवावे.

तरी याद्वारे पुनःश्च आदेश देण्यात येत आहेत की, सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा (जिल्हा कार्यालये) यांनी ग्रामपंचायतीचे वार्षिक लेखे प्रमाणित करण्याची कार्यवाही तात्काळ अंमलात आणावी.

(का.मा.विधाते)
संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य.

प्रत अग्रेषित :-

१) मा.प्रधान महालेखाकार, महालेखाकार- १, प्रतिक्षा भवन, महर्षि कर्वे रोड, मुंबई - ४०० ०२०
२) मा.महालेखाकार कार्यालय-२, सिव्हील लाईन्स, नागपूर

प्रत माहिती तथा उचित कार्यवाहीस्तवः-

१) सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोंकण विभाग, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर
२) सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा.(सर्व)
३) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा (सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा जिल्हा कार्यालयांमार्फत)
४) कार्यालयीन आदेश नस्ती.